# पुणे महानगरपालिका

## जाहिर प्रकटन

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील ज्युनिअर ग्रेड लेखनिक पदाच्या रिक्त जागा भरणेसाठी विविध गटातील उमेदवारांची निवड / प्रतिक्षा यादी तयार करणे करिता दि. २/६/२००८ रोजी दैनिक सकाळ व लोकमत त्याचप्रमाणे दि. १८/१२/२००८ रोजी दैनिक लोकमत व प्रभात मध्ये जाहिरात प्रसृत करण्यात आली होती.

या जाहिरातीमध्ये विहीत शैक्षणिक पात्रतेनुसार मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक होते.

ज्या उमेदवारांनी वरील जाहिरातीनुसार अर्ज केले आहेत परंतु जाहिरातीच्या दिनांकास मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर केले नव्हते किंवा ज्या उमेदवारांनी अंतिम दिनांकानंतर प्रमाणपत्र प्राप्त केली आहेत अशा उमेदवारांनी सदर प्रमाणपत्राची छायांकित प्रत सांक्षाकित करुन दिनांक २६/०२/२०१० अखेर पर्यत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत (स.१०.३० ते सायं.५.३० अखेर) पुणे महानगरपालिका मुख्य इमारत, सेवकवर्ग विभाग दुसरा मजला, खोली क्र. २४० शिवाजीनगर पुणे ४११००५ येथे टपाला द्वारे अथवा समक्ष येवून सादर करावी.

सदर प्रमाणपत्रा सोबत स्वत:चे संपूर्ण नाव, जाहिरात दिनांक, अर्जाचा क्रमांक, अर्ज सादर केलेल्या संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे नाव, तसेच ज्या उमेदवारांनी सेवायोजन/ प्रकल्पग्रस्त/ अदिवासी विकास प्रकल्प यांचे यादीनुसार अर्ज केले आहेत त्यांनी तसा स्पष्ट उल्लेख करुन इत्यादी माहितीसहीत सोबत स्वत:च्या स्वाक्षरीसह अर्ज जोडणे बंधनकारक आहे,

जे उमेदवार वरील विहीत मुदतीत व विहित माहितीसह मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. शासनमान्य परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणार नाहीत अशा उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. टपालाद्वारे पाठविलेली प्रमाणपत्रे चुकिचा पत्ता व टपाल खात्याच्या दिरंगाई मुळे विलंबाने प्राप्त झाल्यास त्याची जबाबदारी महापालिकेवर राहणार नाही.

**अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि)**
पुणे महानगरपालिका